PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Suwasini
Year: 1961

Song: Divsamaguni Divas Chalale
Lyricist: Ga. Di. Madgulkar

दिवसा मागूनी दिवस चालले
ऋतू मागूनी ऋतू
जिवलगा कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू
धरेस भिजवून गेल्या धारा
फुलून जाईचा सुके फुलोरा
धरेस भिजवून गेल्या धारा
फुलून जाईचा सुके फुलोरा
नभ धरणीसी जोडून गेले
सप्तरंगसी तू
कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू

शारद शोभा आली गेली
रजनीगंधा फुलली सुकली
शारद शोभा आली गेली
रजनीगंधा फुलली सुकली
चंद्रकलेसम वाढून विरले
अंतरीचे हे गुज
कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू

हेमंती तर नुरली हिरवळ
शिशिर करी या शरीरा दुर्बळ
हेमंती तर नुरली हिरवळ
शिशिर करी या शरीरा दुर्बळ
ना वसंती डोलू लागे
प्रेमांकितके दूर
कधीरे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू

पुनरपी ग्रीष्मी तीच काहिली
मेघावली नभी पुनरपी आली
पुनरपी ग्रीष्मी तीच काहिली
मेघावली नभी पुनरपी आली
पुनःश्च वर्षा लागे अमृत
पुनःश्च वर्षा लागे अमृत
विरहावर ओतू
कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू
जिवलगा कधी रे येशील तू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*